MHKO100001142026

**नियमीत दिवाणी दावा क्र. २६/२०२६**

शंकर चौगुले
//वि//
गुडूसाब छेडेदार.

**निशाणी क्र. ३० वर आदेश**

वादी यांनी सदर अर्ज निशाणी क्र.५ वरील अर्ज नामंजुर झाल्यानंतर जैसे थे परिस्थिती ठेवणेबाबत झालेला निशाणी १६ वरील आदेश अपिल कालावधीपर्यंत कायम करणेत यावा याकरीता दाखल केला आहे.

०२. सदर अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, नि.५ वरील अर्ज गुणदोषावर निर्णीत झाल्यानंतर जैसे-थे परिस्थिती ठेवणेचा आदेश कायद्याने संपुष्टात आला आहे. त्यामुळे, तो आदेश पुढे चालू ठेवता येणार नाही. वादीस वरिष्ठ न्यायालयात अपिल दाखल करुन आदेश मिळविणे गरजेचे आहे.

०३. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

०४. निशाणी क्र.५ वरील आदेश वादी व प्रतिवादी यांचे तसेच अभिलेखावरील कागदपत्रे, दोन्ही बाजूंचे युक्तीवाद व त्यांनी दाखल केलेले न्यायनिर्णय याचा सारासार विचार करुन पारित केला आहे. तुर्तातूर्त ताकीद अर्ज नामंजुर झाल्यानंतर वादीच्या लाभात पारित केलेला निशाणी क्र.१६ वरील जैसे-थे परिस्थिती ठेवणेचा आदेश रद्द झाला आहे. सकृतदर्शनी वाद, न्यायाचा समतोल व अपरिमीत नुकसान याचा विचार करुन सदर अर्ज नामंजुर करण्यात आला आहे. त्यामुळे, जैसे-थे परिस्थिती कायम ठेवणेचा आदेश कायम केला तर प्रतिवादी यांचे अपरिमीत नुकसान होणार आहे. त्यामुळे, वादीतर्फे विधीज्ञ यांनी कथन केल्याप्रमाणे दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ मधील अधिकारांचा वापर याठिकाणी करणे योग्य होणार नाही. म्हणुन, मी खालील आदेश पारित करत आहे.

**-: आदेश :-**

अर्ज नामंजुर करण्यात येतो.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
DHANASHRI
MAHADEV PAWAR
Date: 2026.04.23
15:09:08 +0530

डी. एम. पवार
२रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः २३/०४/२०२६.